दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २००) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.०७ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## तरुण तेजपालला बलात्कार प्रकरणात १० वर्षांचा तुरुंगवास, मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाचा निर्णय

पणजी दि.६ (वृत्तसंस्था)- तहलकाचा माजी संपादक तरुण तेजपाल याला मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने १० वर्षांची शिक्षा सुनावली आहे. २०१३ मध्ये तरुण तेजपालने त्याच्या तहलका या मासिकात काम करणाऱ्या सहकारी महिलेवर दोनवेळा बलात्कार केला होता. ७ आणि ८ नोव्हेंबर २०१३ ला ही घटना घडली होती. या प्रकरणात त्याला ३० नोव्हेंबर २०१३ ला अटक झाली. त्यानंतर २०१४ मध्ये त्याला जामीन मिळाला. तर मुंबई सत्र न्यायालयाने २०२१ मध्ये या प्रकरणात त्याला पुराव्यांच्या अभावी निर्दोष सोडलं होतं. पण मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने हा निर्णय रद्द केला आणि तरुण तेजपालला दोषी ठरवलं. आता या प्रकरणात त्याला १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

मी ६२ वर्षांचा आहे आणि मला वाटतं आहे की मीच पीडित आहे. माझी पत्नी आहे. यापेक्षा माझ्याकडे सांगण्यासारखं काहीही नाही. माझ्या शिक्षेबाबत खंडपीठाने सौम्यपणा दाखवावा. आम्ही या निर्णयाच्या विरोधात अपील करु शकतो. बाकी सर्व तथ्यांची नोंद न्यायालयाने घेतली आहे.सुनावणीवेळी न्यायालयात उपस्थित असलेल्या तेजपालने आपण दोन मुलींचे वडील असल्याचा दावा करत दयेची याचना केली, तर गोवा सरकारतर्फे हजर असलेले सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ''नाही म्हणजे नाही'' असा संदेश देण्यासाठी कमाल शिक्षेची मागणी केली होती. ज्यानुसार गोवा खंडपीठाने तरुण तेजपालला १० वर्षांची शिक्षा सुनावली आहे.

# निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करायला नको होता

## शिवसेना कुणाची प्रकरणात ठाकरे गटाचे वकिल कपिल सिब्बल यांचा सवाल

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करायला नको होता. पक्षात प्रथमदर्शनी फूट पडली आहे या निष्कर्षापर्यंत पोहचण्याआधी आवश्यक पुरावे आणि साहित्य सामुग्री आपल्याकडे आहे का याची खात्री पटवणे गरजेचे होते. २१ जून रोजी पक्षात कोणतीही फूट पडल्याचे चिन्ह नव्हते. आमच्याकडून चिन्ह काढून घेतले. त्यानंतर बेकायदेशीर सरकार स्थापन झाले. त्यामुळे तुम्ही अपात्रतेचा निर्णय घेण्याआधी निवडणूक आयोगाच्या मुद्द्यावर निर्णय घ्या अशी मोठी मागणी ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सुप्रीम कोर्टात केली.

या प्रकरणी सुनावणी करताना कपिल सिब्बल म्हणाले की, १९९९ मध्ये पक्षाची मूळ घटना नव्हती त्यातही नंतर सुधारणा करण्यात आल्या होत्या. ऑगस्ट-ऑक्टोबर २०२२ मध्ये निवडणूक आयोगासमोरील कार्यवाहीत दोन्ही गटांनी पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील आपल्या समर्थनाबाबत प्रतिज्ञापत्रे सादर केली होती. राष्ट्रीय कार्यकारणीतील १६० सदस्य उद्धव ठाकरेंकडे होते तर दुसऱ्या गटाकडे शून्य सदस्य होते. २०१८ ची घटना सोयीस्कर बाजूला केली पण निवडणूक आयोग असे कसे करू शकते? असा सवाल त्यांनी कोर्टात उपस्थित केला.

तसेच २०१८ च्या घटनेनुसार आम्ही काम करत आहोत असं दोन्ही गट मान्य करत आहेत. मग निवडणूक आयोग कोणत्या कायद्याच्या आधारे हा निर्णय घेतला? २०१८ साली झालेल्या राष्ट्रीय कार्यकारणीत उद्धव ठाकरेंची पक्षप्रमुख म्हणून निवड केली होती. त्यात शिंदे यांची नेतेपदी निवड झाली होती. मग एकनाथ शिंदे पक्षाची घटना कशी बदलू शकतात? निवडणूक आयोगाने त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर जाऊन निर्णय घेतला. पक्षाची मान्यता रद्द करणे हा अधिकार निवडणूक आयोगाला आहे परंतु निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह शिंदेंना देण्याचा निर्णय घेतला हे अन्यायकारक आहे. जेव्हा संस्था लोकांचा विश्वास संपादन करू शकत नाही तेव्हा अशी परिस्थिती उद्भवते असं कपिल सिब्बल यांनी कोर्टात सांगितले.

दरम्यान, निवडणूक आयोगाचा निर्णय आणि आमदार अपात्रतेबाबत निर्णय हा एकमेकांशी संबंधित आहे. त्यातील तथ्ये सारखीच आहेत. अपात्रतेबाबत अध्यक्षांकडून केलेली चौकशी वेगळी प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडल्याचे सिद्ध झाले आहे का? स्वेच्छेने सदस्यत्व सोडणे म्हणजे पक्षाशी असलेला संबंध थेट तोडून टाकणे नव्हे असं घटनापीठाचे असे मत आहे. हे काही अंतिम निरीक्षण नाही, त्यामुळे त्याचा तसा अर्थ घेऊ नका. आम्हाला या मुद्द्यावर स्पष्टता हवी. विधानसभा अध्यक्षांनी कशाच्या आधारे निर्णय घेतला? असं कोर्टाने विचारले.

### पक्षाची रचना अक्षरशः एका व्यक्तीच्या हाती केंद्रित झाली-न्यायालय

''आमदारांवरील अपात्रतेची कारवाई आणि पक्षचिन्ह हे वेगवेगळे विषय आहेत. अपात्रतेच्या कारवाईचा निकाल लागल्यानंतर आणि नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर, चिन्हाचा मुद्दा कदाचित दुय्यम ठरू शकेल. अपात्रतेचा विचार करताना व्यक्तीने स्वेच्छेने राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले आहे का, हा प्राथमिक निकष असतो. विधिमंडळ पक्षाचे सदस्यत्व स्वेच्छेने सोडल्याने मूळ राजकीय पक्षाशी असलेला संबंध आपोआप संपुष्टात येत नाही,'' असे निरीक्षण आज (दि.६ ऑगस्ट) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी व्यक्त केले. सर्वोच्च न्यायालयात आज (दि. ६ ऑगस्ट) सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणी सुनावणी झाली. ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. यावेळी न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली.

# मोदींनी माफी मागावी, अमित शाहांनी संसदेत निवेदन सादर करावे; मल्लिकार्जुन खरगे विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जप्रकरणी आक्रमक



नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटीच्या विरोधात कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीने दिल्लीत करण्यात आलेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेल्या लाठीचार्जच्या घटनेवरून विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाने राजकारण तापलेलं आहे. यावरून लोकसभा आणि राज्यसभेतही मोठा गदारोळ झाल्याचं पाहायला मिळालं. गेल्या काही दिवसांत अनेकदा दोन्ही सभागृहाचं कामकाज गदारोळामुळे स्थगित करावं लागलं.

मोर्चादरम्यान दिल्ली पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेल्या कारवाईवरून मल्लिकार्जुन खरगे हे पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. 'पंतप्रधान मोदींनी चूक मान्य करून माफी मागावी आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज प्रकरणावर अमित शाह यांनी सभागृहात निवेदन सादर करावं', अशी मागणी मल्लिकार्जुन खरगे यांनी केली आहे.

''राज्यसभेच्या खासदारांनी आज (६ ऑगस्ट) अध्यक्षांची भेट घेऊन मागणी केली आहे की, पंतप्रधान मोदी यांनी माफी मागावी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात निवेदन सादर करावं. त्यामुळे त्यांना सभागृहात बोलवावं. जगाच्या दुसऱ्या एखाद्या ठिकाणी काय चाललंय? याचं उत्तर आम्ही मागत नाहीत'', असं म्हणत मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारवर टीका केली.

''आम्ही विशेषतः पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेल्या कारवाईबाबत विचारणा करत आहोत. मात्र, तरीही पंतप्रधान मोदी आणि अमित शाह हे सभागृहात येण्यास तयार नाहीत. विद्यार्थ्यांना त्यांचं आंदोलन मागे घेण्यास सांगायचं असतं तर सरकार तसं आवाहन करू शकलं असतं. पण तसं करण्यात आलं नाही. त्यामुळे यावर गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात निवेदन सादर करावं अशी सर्वांची मागणी आहे असं आम्ही केंद्रीय संसदीय कामकाज मंत्र्यांना कळवलं आहे'', असं मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं आहे.

''विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज, कथित पेलेट गन्स अशा गोष्टींचा वापर विद्यार्थ्यांच्या विरोधात कधीही केला जाऊ नये, पण सरकारने हा वापर केला. आंदोलनावेळी विद्यार्थ्यांनी कोणताही उपद्रव केला नव्हता. सरकारी वाहनांचं नुकसान झालं नव्हतं. एखाद्या लोकप्रतिनिधीला अडवलं होतं का? नाही. मात्र, तरीही विद्यार्थ्यांवर ज्या पद्धतीने कारवाई करण्यात आली ती चुकीची होती'', असं मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे.

# जात प्रमाणपत्र पडताळणीत रद्द करण्यासाठी सरकारने कट रचल्याचा मनोज जरांगे यांचा आरोप

जालना दि.६ (प्रतिनिधी)- सरकारने मराठे संपवण्याचा कट रचल्याचे मनोज जरांगे यांनी आज आरोप करतांना म्हटले आहे. राज्यात सरकारपासून एक कट शिजला गेला. फडणवीस आणि शिंदे यांच्या मंत्र्यांकडून कट शिजला जात आहे. नोंदी त्यांनीच द्यायच्या आणि रद्द सुद्धा त्यांनीच करायच्या. मी एकटा पडावा म्हणून सरकारने जाणून बुजून कट रचला. पुरेपूर आणि नियोजित कट सरकारकडून रचला गेला. मी सर्व लोकप्रतिनिधी यांच्यासोबत चर्चा केली. सरकारने निवडून मराठ्यांकडून यायचं आणि नंतर मराठ्यांचा घात करायचा. आम्ही २०२९ ला सर्वात मोठा बदला घेऊ, असा मोठा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला आहे.

पुढे मनोज जरांगे यांनी म्हटले की,ज्योती शिंदे यांचं प्रमाणपत्र तुम्ही कायमच रद्द करा. प्रचंड गैरसमज निर्माण केला गेला. राजकीय द्वेष्यातून रद्द केले. फडणवीस तुम्ही विनाकारण मराठे अंगावर घेतायत, बावनकुळे रद्द करायला सांगतात. यशवंता दहीहंडे यांची उर्दू मधील नोंद सापडली आहे. हिच नोंद ग्रामपंचायतमध्ये लावली आहे.

तुमचा म्हणजे बीजेपी निवडून आला नाही म्हणून तुम्ही फोन करून रद्द करायला लावला. जरांगे पाटील लोकप्रतिनिधी यांचे पुरावे दाखवताना संतप्त झाले आहे. सरकारच्या एकाही अधिकाऱ्याकडे इतके पुरावे नसतील, जेवढे दाखवत आहेत. बावनकुळे यांनी सांगितलं की नोंदी रद्द करा. त्यांनी पत्र दिले. आता सरकारवर जोरदार टीका जरांगे यांनी केली.

देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांचे मंत्रीच हे प्रमाणपत्र रद्द करायला सांगत असल्याचा खळबळजनक दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला. यासोबतच २०२९ मध्ये सांगू असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले. सरकारला मोठा इशारा त्यांनी दिला. आमच्याकडे पुरावे असूनही प्रमाणपत्र बोगस का म्हणतात, असा प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी यादरम्यान उपस्थित केला. सत्ता तुमच्या हातात आहे म्हणून खोटे प्रयोग करून नुकसान करू नका, असेही त्यांनी म्हटले.

# जात पडताळणी समिती सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार काम करते आहे-मुख्यमंत्री

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- मराठवाड्यातील नवीन कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले. त्यामुळे काही निवडून आलेले लोकप्रतिनिधी अडचणीत आले. १५ लाख रुपयांसाठी हे प्रमाणपत्र रद्द करण्याचा गंभीर आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला. अंतरवाली सराटीत त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत विचारलं असता त्यांनी मनोज जरांगेंना उत्तर दिलं आहे.

मनोज जरांगे काय बोलले ते मी ऐकलेलं नाही. पण मी हे स्पष्ट सांगतो की प्रमाणपत्र जेव्हा जात पडताळणी समितीकडे जातात. तेव्हा या समिती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अंतर्गत काम करत आहेत. राज्य सरकारचा त्यात हस्तक्षेप नाही. जे काही नियम सर्वोच्च न्यायालयाने दिलेत त्यानुसार काम चाललं आहे. कुणबी प्रमाणपत्रं किती रद्द केली त्याची मला कल्पना नाही, पण मोठ्या प्रमाणात जी प्रमाणपत्रं येतात त्यात १० ते १२ टक्के हा रिजेक्शन रेट आहे. नॉन कुणबी प्रमाणपत्रं आल्यास, कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास ती रद्द होतात. जाणीवपूर्वक कुणीतरी प्रमाणपत्रं रद्द करतंय असं म्हणणं योग्य नाही. तथापि याही संदर्भात कुणाचा काही आक्षेप असेल तर तो पाहण्यात येईल. वरिष्ठ अधिकारी त्यात लक्ष घालतील. यात अपिल करण्याचीही तरतूद आहे. भाजपाच्याही अनेक नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्यांची प्रमाणपत्रं जात पडताळणी समितीने रद्द केली आहेत. यात कुठलाही राजकीय भाग नसतो. न्यायालयीन प्रक्रिये प्रमाणे ही प्रक्रिया चाललेली आहे.

मनोज जरांगे यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही आरोप केला होता. १५ लाखांची मागणी केली जात असल्याचं म्हटलं होतं. त्यावर विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले सरकारमधले कुठलेच मंत्री असं काही करणार नाही. पण आमच्याकडून अन्याय झाला असेल तर त्यांनी अपिल करावं. ज्या त्रुटी काढल्या गेल्या आहेत त्याची पूर्तता करता येते असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंय.

### जात पडताळणी समितीचा निर्णय अंतिम नाही-बावनकुळे

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपांना राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. माझी नार्को टेस्ट करण्यास कोणतीही अडचण नाही. मी त्याला परवानगी देईन. जात पडताळणी करणारा विभाग हा अर्ध न्यायिक विभाग आहे. त्यात शासनाला हस्तक्षेप करता येत नाही. जात पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयात माझा किंवा सरकारमधील मंत्र्यांचा हस्तक्षेप आहे, असे म्हणणे अयोग्य ठरेल. पडताळणीचा विभाग स्वतंत्र असून ते त्यांच्या अधिकारात काम करतात, असे उत्तर चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

जात पडताळणी समितीने कोणताही निर्णय दिला असला तरी त्याविरोधात उच्च न्यायालयात अपील करता येते. आमच्यावर अन्याय झालेला आहे, असे कुणाला वाटत असेल तर त्यांनी उच्च न्यायालयात जाऊन त्या निर्णयावर स्थगिती आणता येते, असेही बावनकुळे म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या इतर आरोपांवर आपण प्रतिक्रिया देणार नाही, असेही चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले. जात पडताळणी समितीच्या निर्णयावर आक्षेप असेल तर उच्च न्यायालयात त्या संदर्भात अपील करावे, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेऊन मराठ्यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. ''राजकीय द्वेषातून प्रमाणपत्र रद्द केले. देवेंद्र फडणवीस तुम्ही विनाकारण मराठ्यांना अंगावर घेत आहात, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे रद्द करायला सांगत आहेत. बावनकुळे हे काय फडणवीसांचे मालक (पान ४ वर)

# फडणवीस एका व्यक्तीमुळे नाही, अठरापगड जातींच्या ताकदीवर मुख्यमंत्री झाले-प्रवीण दरेकर

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी नाशिकमध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. कुणबी प्रमाणपत्र, मराठा आरक्षण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत जरांगेंनी केलेल्या वक्तव्यांवर प्रतिक्रिया देताना दरेकर म्हणाले की, प्रत्येकाने आपल्या मर्यादेत राहून बोलावे. तसेच देवेंद्र फडणवीस हे एका व्यक्तीमुळे नव्हे, तर राज्यातील अठरापगड जाती आणि बहुजन समाजाच्या पाठिंब्यामुळे मुख्यमंत्री झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रवीण दरेकर म्हणाले की, पुन्हा पुन्हा आक्रमक होणे हा त्यांचा अधिकार आहे, मात्र विषय समजून घेणे हे महत्त्वाचे आहे. जात प्रमाणपत्र पडताळणीत अवैध असेल तर मी म्हणतो म्हणून प्रमाणपत्र द्या, असे करता येत नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रमाणपत्र योग्य असेल, तर त्यांनी पुन्हा शासकीय सिस्टीममध्ये जावे. जाणीवपूर्वक एखाद्याचे प्रमाणपत्र अवैध ठरवावे, असे सरकार कधीही करणार नाही. देवेंद्रजी हे मराठा समाजाच्या आरक्षणाच्या निर्णयावर सकारात्मक आहेत. त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मराठा समाजाला ओबीसीसदृश सर्व सवलती दिल्या आहेत. मात्र कोणाला राजकारण करायचे असेल, तर तो (पान ४ वर)

# सीजेपी सप्टेंबरपासून ''क्या बोलती पब्लिक'' हे देशव्यापी अभियान सुरु करणार

## अभिजीत दिपके यांची माहिती; जे कधी शाळेत गेले नाहीत ते सरकार चालवत असल्याचा आरोप

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- कॉकरोच जनता पार्टी येणाऱ्या सप्टेंबर महिन्यात ''क्या बोलती पब्लिक'' हे राष्ट्रीय अभियान सुरू करणार आहे, जो एक देशव्यापी दौरा असेल. या कॅम्पेनमधून आम्ही देशभरात दौरा करणार आहे, आम्ही लोकांकडून समजून घेणार आहे त्यांच्या समस्या काय आहेत, त्यांच्या अपेक्षा काय आहेत. कारण सध्याचे सत्ताधारी आणि राजकीय पक्ष लोकांपासून पूर्णपणे ''डिस्कनेक्ट'' झाले आहेत आणि लोकांचे ऐकून घेण्यास तयार नाहीत आणि आपल्याला दुर्लक्षित केलं जात असल्याची भावना लोकांमध्ये झाल्याचे ते म्हणाले.

सरकारला फक्त एकच मुद्दा दिसतो तो म्हणजे हिंदू-मुसलमानचा. पण बेरोजगारी, देशाची आर्थिक परिस्थिती आणि शिक्षणाची किती वाईट अवस्था आहे, यावर कोणीच काही बोलायला तयार नाही. आज आपल्या देशात शिक्षण न परवडणारे झालं आहे. पहिली-दुसरीच्या मुलांसाठी वर्षाची फी एक-दीड लाख आहे, आणि प्रायव्हेट शाळांमधील डोनेशन वेगळेच. कॉलेजच्या वाढलेल्या फी आणि कोचिंग क्लासेसमुळे सामान्य पालकांवर प्रचंड बोजा पडत आहे. आजच्या काळात आपल्या देशात शिक्षण घेणं म्हणजे डोक्यावर कर्ज ठेवणं आहे असे सिजेपीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत म्हटले आहे.

यावेळी बोलतांना अभिजित दिपके म्हणाले की, सुशिक्षित बेरोजगारांपैकी ८० टक्के लोकांकडे पदव्या आहेत. देशातील तरुणांना वाटत आहे की ''आम्ही शिकून काही चुकी केली आहे का? कारण ज्या लोकांनी कधी फॉर्मल डिग्री घेतली नाही ते सरकार चालवतात, निर्णय घेतात, पण ज्या तरुणांनी लहानपणापासून मेहनत केली, डिग्री घेतली, त्यांना असं वाटतंय की आम्ही डिग्री घेऊन चुकी केली कारण आमचं भविष्य अशिक्षित लोक ठरवत आहेत, अशा शब्दात कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी हल्लाबोल केला. बेरोजगारी हा आता निवडणुकीचा आणि राजकीय चर्चेचा मुख्य मुद्दा बनवायचा आहे, ज्याला कोणीही दुर्लक्ष करू शकत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

अभिजित दिपेके म्हणाले, तुम्हाला जर कोणी म्हणत असेल की कुठली एक ऑर्गनायझेशन (पान ४ वर)

# भाजपने देश लुटून उद्योगपतींच्या घशात घातला-विजय वडेट्टीवार

नागपूर दि.६ (प्रतिनिधी)- केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारच्या जनविरोधी, शेतकरीविरोधी आणि युवकविरोधी धोरणांच्या निषेधार्थ काँग्रेसतर्फे आज ब्रह्मपुरी येथे काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली विराट जनआक्रोश महामोर्चा काढण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रीडांगण येथून निघालेल्या या मोर्चात हजारो नागरिक, महिला, युवक, शेतकरी, कामगार तसेच काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सरकारविरोधी घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून सोडले.

मोर्चाला संबोधित करताना विजय वडेट्टीवार यांनी भाजप सरकारवर जोरदार टीका केली. भाजप सरकारने सत्तेचा वापर जनतेच्या हितासाठी नव्हे, तर मोजक्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी केला आहे. देशाची संपत्ती विकण्याचे, सार्वजनिक उद्योग कमकुवत करण्याचे आणि सर्वसामान्य जनतेला महागाईच्या खाईत लोटण्याचे काम या सरकारने केले आहे. संपूर्ण देशाला लुटून देश गहाण ठेवण्याचे महापाप भाजप सरकारने केले आहे, असा घणाघात त्यांनी केला.

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले की, महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे, बेरोजगारीमुळे युवकांचे (पान ४ वर)

# आंदोलन का झालं, का नाही याचं उत्तर माझ्याकडं नाही, पण डोळे मिटून मी जेनझीवर विश्वास ठेवेन-मोहन भागवत

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- जेन झींचं आंदोलन का झालं, का नाही ? याची पूर्ण उत्तरं ना माझ्याकडे आहेत, ना तुमच्याकडे आहेत. मीदेखील काही वाचूनच मतं बनवतो आहे. खरं काय, खोटं काय, मला माहिती नाही असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले. मला डोळे मिटून विश्वास ठेवायचं म्हंटलं, तर मी जेनझीवर डोळे मिटून विश्वास ठेवेन असेही मोहन भागवत म्हणाले. मुंबईत मोहन भागवत यांनी आज जे झीशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. आयआयएमयुएनचे संस्थापक ऋषभ शाह यांनी त्यांची मुलाखत घेतली.

आंदोलन डायलॉगचा प्रकार आहे. ऐकलं जात नसेल तर आंदोलन होत असतात. आत्ता जे झालं ते ग्रेव्हिएन्सेस आहे. शिक्षण व्यवस्थेत अनेक गोष्टी व्यवस्थित नाहीत, बदल करायला हवा असे मत मोहन भागवत यांनी व्यक्त केले. आमच्या पिढीत मोठ्यांचे ऐकत होतो. आताचे जेनझी आणि अल्फा प्रश्न विचारतात आणि त्यांना प्रेम पाहिजे. वेगवेगळे ओपिनियन यातून येत असतात

आंदोलन वगैरे जेनझी यांनी करायचे नाही असं मी म्हणणार नाही. मात्र ते कसं करायचं हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात सांगितलं आहे. आंदोलन सिस्टिम करेक्शनसाठी होणं गरजेचं असेही ते म्हणाले. जे कधी व्हायला पाहिजे ते होत नाही तेव्हाच आंदोलनं होतात. जेनझी आपलीच पिढी आहे, आपलेपणा हवा. जेनझी जेन अल्फा आमच्यापेक्षा जास्त प्रामाणिक आहेत असेही ते म्हणाले.

शिक्षण (पान ४ वर)

# काम बंद केले ना, मग पगार घेणंही बंद करा

## डॉक्टरांनी संप तातडीने मागे घेण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना नोंदणी देण्याच्या प्रस्तावाविरोधात संपावर गेलेल्या डॉक्टरांना मुंबई हायकोर्टाने झटका दिला आहे. डॉक्टरांना संप तातडीने मागे घेण्याचे निर्देश मुंबई हायकोर्टाने दिले आहेत. आम्ही तुमची बाजू ऐकून घेऊ पण संप तातडीने मागे घेणे आवश्यक आहे, संप मागे घेतला जात असेल तर आम्ही तुमची बाजू लवकरात लवकर ऐकून घेऊ, असे न्यायालयाने डॉक्टरांना फटकारताना सांगितलं. काम बंद केलंत ना, मग पगार घेणंही बंद करा, अशा शब्दात न्यायालयाने सुनावलं.

दरम्यान, डॉक्टरांनी पुकारलेल्या संपाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाने मार्डची चांगलीच खरडपट्टी केली. न्यायालयाने प्रश्नांची सरबत्ती करताना डॉक्टरांनी संप करणं योग्य आहे का? अशी विचारणा केली. (पान ४ वर)

# नियमानुसार काम जमत नसेल तर राजीनामे देऊन घरी जा! तुकाराम मुंढे यांचा एफडीएच्या २९ कर्मचाऱ्यांना इशारा

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तथा आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी त्यांच्या विरोधात तक्रार करणाऱ्या २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना थेट इशारा दिला आहे. ''ज्यांना शासनाच्या नियमांनुसार काम करायचे नसेल त्यांनी राजीनामा देऊन निघून जावे,'' असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सुनावले. त्यामुळे मधील कामकाजाच्या पद्धतीवरून सुरू झालेला वाद आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथील राज्य अन्न आणि औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेतील २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीबाबत खात्याचे मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे तक्रार केली आहे. १५ जुलै रोजी सादर करण्यात आलेल्या निवेदनात दोन शिफ्टमध्ये काम करण्याचा निर्णय, शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम करण्याचे आदेश, रिक्त पदांमुळे वाढलेला कामाचा ताण तसेच त्यामुळे नमुन्यांच्या तपासणीच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सह्याही आहेत.

या तक्रारीनंतर तुकाराम मुंढे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत कर्मचाऱ्यांच्या आक्षेपांना उत्तर दिले. तुकाराम मुंढे म्हणाले, छत्रपती संभाजीनगरमधील कर्मचाऱ्यांनी माझ्या विरोधात मंत्री महोदयांकडे तक्रार केली की सुट्टी दिली जात नाही, अनेक तास काम करावं लागतं. त्यांची पहिली मागणी आहे की, त्यांना इतर कार्यालयांप्रमाणे १०-६ ट्रिटमेंट द्यावी. मुळात लॅब हे कार्यालय नाही. लॅबची सेवा ही २४ तास चालणारी संस्था असते. (पान ४ वर)

# निसर्गाचा कोप की मानवी लोभ?

निसर्गाचे बदलते रूप केवळ 'ग्लोबल वॉर्मिंग'चे अपत्य नाही, तर ते आपण विकासाच्या नावाखाली केलेल्या पर्यावरणाच्या कत्तलीचे आणि नियोजनाच्या नावाने चालवलेल्या अनागोंदीचे थेट फलित आहे. मुंबई, पुणे, बंगळुरूसारखी महानगरे पाण्याखाली जाणे, सह्याद्रीचा कणा ढासळणे ही आता नैसर्गिक नव्हे, तर मानवनिर्मित आपत्ती बनली आहे.

पर्जन्यराजाचे आगमन झाले, की एके काळी बळीराजाच्या डोळ्यात कृतज्ञतेचे प्रबोधन व्हायचे आणि चाकरमान्यांच्या मनात आनंदाचे तरंग उमटायचे; पण आज परिस्थिती बदलली आहे. आता मॉन्सून येतो तो 'आनंद' घेऊन नाही, तर 'धडकी' भरवून... हवामान विभागाने जाहीर केलेल्या देशाच्या मॉन्सून नकाशावर नजर टाकली, तर संपूर्ण देश एका विचित्र हवामान विसंगतीच्या विळख्यात अडकलेला दिसतो. कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे जलप्रलय! 'अल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा मॉन्सून सुरुवातीला रेंगाळला, देशातील बहुतांश राज्ये कोरडी राहिली, तर दुसरीकडे अवघ्या काही दिवसांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस पडून शहरांची आणि नद्यांची दुरवस्था झाली. आज देशातील प्रत्येक मोठे शहर पहिल्याच मुसळधार पावसात 'बेटा'चे स्वरूप धारण करते. शहरे का तुंबतात, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी फार मोठ्या तज्ज्ञांची गरज नाही. याचे मूळ आपल्या चुकीच्या नागरीकरणात आणि काँक्रीटीकरणाच्या अघोरी हव्यासात दडलेले आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपण शहरांमधील मातीचा प्रत्येक तुकडा सिमेंट आणि डांबराने गाडून टाकला आहे. पूर्वी पडणारा पाऊस जमिनीमध्ये जिरायचा. त्यामुळे भूजल पातळी वाढायची आणि पाण्याचा प्रवाह संथ व्हायचा. आज शहरांमध्ये माती उरलीच नसल्यामुळे पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब थेट रस्त्यावर येतो. काँक्रीटीकरणामुळे पाण्याचा नैसर्गिक निचराच पूर्णपणे बंद झाला आहे. त्यात भर पडली आहे ती आपल्या निकृष्ट ड्रेनेज सिस्टीमची. ब्रिटिश काळात किंवा त्यापूर्वी बांधलेल्या वाहिन्यांवर आज कोट्यवधींच्या लोकसंख्येचा आणि सिमेंटच्या जंगलाचा भार टाकला जात आहे. परिणामी, पुढील आक्रीत ओढवते.

कचरा, प्लास्टिक आणि गाळाने तुंबलेले नाले आणि गटारे एवढ्या प्रचंड पाण्याचा भार पेलू शकत नाहीत. परिणामी, रस्ते हेच नद्या बनतात आणि चकचकीत महानगरे काही तासांमध्येच दलदलीत रूपांतरित होतात. बंगळुरू आणि पुणे ही देशातील 'आयटी हब' आणि शिक्षणाची माहेरघरे म्हणून ओळखली जाणारी शहरे आज पूरपरिस्थितीचे सर्वात मोठे बळी ठरत आहेत. बिल्डर लॉबी आणि भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेने मिळून शहरांचा गळा घोटला आहे. पुणे असो वा बंगळुरू; इथे नैसर्गिक ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषा बुडवून टोलेजंग इमारती, 'आयटी पार्क' आणि गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. बंगळुरूसारख्या शहरात पूर्वी शेकडो तलाव होते. ते एकमेकांशी नैसर्गिक नाल्यांनी जोडलेले होते. अतिरिक्त पाणी एका तलावातून दुसऱ्या तलावात वाहून जायचे. आज ते सर्व नाले आणि तलाव गिळंकृत करून त्यावर सिमेंटचे साम्राज्य उभे राहिले आहे. पुण्यातही बंगळुरूची पुनरावृत्ती झाली आहे. मुळा-मुठा नदीपात्रात झालेली अतिक्रमणे, रामनदी आणि इतर छोट्या ओढ्यांचे अस्तित्व मिटवून टाकल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जायला जागाच उरलेली नाही.

यासंदर्भात मावळातून वाहणाऱ्या आणि पिंपरी-चिंचवड, पुण्याची तहान भागवणाऱ्या पवना नदीचे उदाहरण ताजे आहे. पवना नदीच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला, की धरणातून विसर्ग करावा लागतो; मात्र नदीपात्र अरुंद झाल्यामुळे आणि पात्रातच राडारोडा, बांधकामे झाल्यामुळे हे पाणी आजूबाजूच्या नागरी वस्त्यांमध्ये शिरते. यंदा पवना नदीला आलेल्या पुरामुळे शेकडो कुटुंबांना आपले घरदार सोडून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. देहू, आळंदी परिसरातून वाहणाऱ्या पवित्र इंद्रायणी नदीचा प्रकोपही यंदा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला. इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे केवळ शेतीचेच नुकसान झाले नाही, तर उद्योग आणि वाहतुकीचा कणा मोडला. पुणे-नाशिक महामार्गावर चाकण आणि आसपासच्या परिसरात तीन-चार फूट पाणी साचल्याने अलिकडेच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. हा महामार्ग राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. इथे हजारो औद्योगिक कंपन्या आहेत; पण पाण्याचा निचरा होण्यासाठी महामार्गाच्या कडेला आवश्यक त्या वाहिन्याच तयार केल्या गेल्या नाहीत. आजूबाजूच्या टेकड्या आणि नैसर्गिक नाले बुजवून कंपन्या आणि व्यावसायिक गाळे उभारल्यामुळे महामार्गच एका मोठ्या धरणात रूपांतरित झाला. शहरांची ही अवस्था असताना, महाराष्ट्राचे कवच मानल्या जाणाऱ्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वेगळेच आणि अत्यंत भीतीदायक संकट उभे राहिले आहे. महाबळेश्वर, ताम्हिणी, माळशेज, वरंधा आणि आंबेनळी घाटात दर वर्षी होणाऱ्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सह्याद्रीचा डोंगर खचत आहे, रस्ते वाहून जात आहेत आणि दरडी कोसळून निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. माळीणच्या आठवणी अजून ताज्या असताना आता मावळात पाटणची घटना सुन्न करणारी ठरली. पर्यटन आणि विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर चाललेली अंदाधुंद तोडफोड ही त्याची कारणे आहेत. रिसॉर्ट्स बांधण्यासाठी, रस्ते रुंदीकरणासाठी डोंगरांचे पायथे जेसीबी लावून उकरले जात आहेत.

डोंगरांना धरून ठेवणारी झाडे नष्ट केली जात आहेत. यामुळे डोंगराची माती सैल होते आणि मुसळधार पाऊस झाला, की ती थेट खाली कोसळते. सह्याद्रीच्या पर्यावरणाशी चाललेला हा खेळ केवळ घाटापुरता मर्यादित नसून, संपूर्ण किनारपट्टी आणि दख्खनच्या पठाराला धोक्यात आणणारा आहे. या संपूर्ण प्रलयात सर्वात मोठी शोकांतिका पुढेच आहे. एका बाजूला शहरे पाण्यात बुडत असताना 'सेंट्रल वॉटर कमिशन'च्या अहवालानुसार देशातील प्रमुख १६६ धरणांमध्ये केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दक्षिण भारतात आणि महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जलाशयांची पातळी सामान्यपेक्षा ४० ते ५० टक्क्यांनी खाली आहे. याचा अर्थ पडणारा पाऊस आपण साठवू शकत नाही. कमी कालावधीत जास्त पावसामुळे पाणी वेगाने वाहून जाते, महापूर येतो आणि पाणी समुद्राला मिळते नीती आयोग म्हणतो, की २०३० पर्यंत देशातील २१ मोठ्या शहरांमधील भूमिगत पाणी संपुष्टात येईल. आपण आज पडणारे पाणी जमिनीखाली जिरवू शकलो नाही, तर पावसाळ्यात पुराच्या पाण्यात बुडणारी हीच शहरे उन्हाळ्यात पाण्यासाठी टँकरच्या रांगेत उभी असलेली दिसतील. आपण आताच सुधारलो नाही, तर डॉ. इस्माइल सेरागेल्डिन यांनी वर्तवलेले भाकीत खरे ठरेल. त्यांच्या म्हणण्यानुसार पुढील युद्धे पाण्यासाठीच होतील. या संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला युद्धपातळीवर काही पावले उचलावी लागतील. शहरांमधील ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषेवरील सर्व बांधकामे तात्काळ पाडावी लागतील. 'स्पंज सिटी' ही संकल्पना राबवून शहरांमध्ये पाणी शोषून घेणारी उद्याने आणि खुली मैदाने राखली पाहिजेत. रस्ते बांधताना आणि गल्लीबोळात पेविंग ब्लॉक बसवताना पाण्याचा निचरा होण्यासाठी मातीचा भाग सोडणे कायद्याने बंधनकारक केले पाहिजे. घाटमाथ्यावरील आणि संवेदनशील डोंगराळ भागांमधील उत्खनन आणि बेकायदेशीर बांधकामांवर संपूर्ण बंदी घालण्याची वेळ आली आहे. माधव गाडगीळ समितीच्या अहवालाकडे पुन्हा एकदा गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. महामार्ग आणि लोहमार्ग बांधताना पाणी वाहून जाण्याच्या नैसर्गिक मार्गांना धक्का लागणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. या काही बाबींकडे लक्ष दिले गेल्यास उत्तम, अन्यथा येत्या काळात अनर्थ टाळता येणार नाही.

# आव्हान समान ऊर्जावाटपाचे

**भारताकडे** ऊर्जा क्षेत्रात जगाला मार्गदर्शन करण्याची क्षमता आहे; मात्र देशातील प्रत्येक घर, शेत, शाळा आणि रुग्णालयाला समान गुणवत्तेची वीज मिळेल तेव्हाच त्या नेतृत्वाला खरी प्रतिष्ठा मिळेल. ऊर्जा सुरक्षा हा प्रवासाचा पहिला टप्पा होता. आता ऊर्जा न्याय हेच भारताच्या विकासाचे पुढील ध्येय असले पाहिजे. कारण विजेचा प्रकाश केवळ बल्ब नाही, तर समाजातील संधी, समानता आणि विकासाची नवी दिशा उजळवतो.

भारताने गेल्या दशकभरात ऊर्जा क्षेत्रात केलेली प्रगती जगासाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. एके काळी वीजटंचाई, भारनियमन आणि अपुऱ्या उत्पादनामुळे ओळखला जाणारा भारत आज जगातील सर्वाधिक वेगाने ऊर्जा क्षमता वाढवणाऱ्या देशांमध्ये गणला जातो. कोळशावर आधारित प्रकल्पांबरोबरच सौर, पवन, जल आणि अणुऊर्जा या क्षेत्रांमध्ये मोठी गुंतवणूक झाली आहे. देशाची एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता दुपटीहून अधिक वाढली आहे.

राष्ट्रीय वीजग्रीडची क्षमता विस्तारली आहे. नवीकरणीय ऊर्जेतील भारताची झेप जागतिक पातळीवर कौतुकास्पद मानली जात आहे; मात्र या सर्व यशामागे एक मूलभूत प्रश्न आजही अनुत्तरित आहे, तो म्हणजे देशात पुरेशी वीज निर्माण होत असली, तरी प्रत्येक नागरिकापर्यंत समान गुणवत्तेने पोहोचते का? हा प्रश्न केवळ तांत्रिक नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित आहे. कारण ऊर्जा म्हणजे केवळ उद्योगधंद्यांचे इंधन नाही, तर ती शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार आणि सन्मानपूर्वक जगण्याचा पाया आहे. त्यामुळे भारताच्या ऊर्जाधोरणाचा पुढील टप्पा केवळ 'ऊर्जा सुरक्षा' नसून 'ऊर्जा न्याय' असला पाहिजे. गेल्या दहा वर्षांमध्ये केंद्र सरकारने ऊर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली. ग्रामीण विद्युतीकरणाला गती मिळाली. घराघरांमध्ये वीज जोडणी देण्याची मोहीम राबवण्यात आली. विशेष भर देण्यात आला. आज देशाची एकूण वीजनिर्मिती क्षमता ५२० गीगावॉटपेक्षा अधिक झाली आहे. त्यापैकी निम्म्याहून अधिक क्षमता जीवाश्म इंधनाव्यतिरिक्तच्या स्रोतांमधून उपलब्ध होत आहे.

भारताने हवामानबदलाच्या पार्श्वभूमीवर हरित ऊर्जेच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल केली आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमणाच्या जागतिक चर्चेत भारताचे स्थान अधिक मजबूत झाले आहे; मात्र राष्ट्रीय पातळीवरील ही प्रगती प्रत्येक गावात, प्रत्येक शेतात आणि प्रत्येक घरात सारखीच अनुभवाला येते, असे म्हणता येणार नाही. अनेक दुर्गम आदिवासी भाग, डोंगराळ प्रदेश आणि सीमावर्ती गावे आजही खंडित वीजपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जात आहेत. शहरात रोहित्र बिघडल्यास काही तासांमध्ये दुरुस्ती होते; परंतु ग्रामीण भागात अनेकदा दोन-दोन दिवस वीजपुरवठा खंडित राहतो. शेतीपंपांसाठी रात्रीच्या वेळी वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्रभर जागून पाणी द्यावे लागते. अनेक गावांमध्ये कमी दाबामुळे मोटारी चालत नाहीत. याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होतो. देशात शंभर टक्के घरांना वीजजोडणी मिळाल्याचा दावा केला जातो; परंतु मीटर बसवणे आणि चोवीस तास दर्जेदार वीज मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

अनेक घरांमध्ये जोडणी आहे; पण अनियमित पुरवठा, कमी व्होल्टेज किंवा वारंवार होणाऱ्या खंडित सेवेमुळे त्या जोडणीचा अपेक्षित फायदा होत नाही. ऊर्जा न्याय म्हणजे केवळ वीज उपलब्ध असणे नव्हे, तर ती विश्वासार्ह, सुरक्षित आणि परवडणारी असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ऊर्जा क्षेत्रातील दुसरी मोठी समस्या म्हणजे वितरण व्यवस्थेतील विषमता. महानगरांमध्ये खासगी वितरण कंपन्यांमुळे ग्राहक सेवा, ऑनलाइन बिलिंग आणि तक्रार निवारणामध्ये सुधारणा झाली आहे; परंतु ग्रामीण आणि लहान शहरांमध्ये अजूनही जुन्या तारांचे जाळे, अपुरी उपकेंद्रे, कमी क्षमतेची रोहित्रे आणि देखभालीचा अभाव ही वास्तवस्थिती आहे. परिणामी, राष्ट्रीय स्तरावर उत्पादन वाढले असले, तरी वितरणातील कमतरतेमुळे अंतिम ग्राहकाला त्याचा पूर्ण लाभ मिळत नाही. वीजवितरण कंपन्यांच्या आर्थिक सुधारणांवर गेल्या काही वर्षांमध्ये विशेष भर देण्यात आला आहे. तांत्रिक आणि व्यापारी तोटेकमी झाले आहेत. अनेक कंपन्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे; परंतु कोणत्याही वितरण कंपनीचे यश तिच्या नफ्यावर मोजता येत नाही. तिचे खरे यश गरीब, शेतकरी, लघुउद्योजक आणि दुर्गम भागातील नागरिकांना सातत्यपूर्ण वीज उपलब्ध करून देण्यात आहे. आर्थिक सुधारणा झाल्या आणि सेवा निकृष्टच राहिली, तर त्या सुधारणांचा सामान्य नागरिकाला काय उपयोग? वीज वितरणामध्ये राजकीय हस्तक्षेप ही आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक राज्यांमध्ये वीजदर हे आर्थिक वास्तवापेक्षा राजकीय समीकरणांवर ठरतात. मोफत वीज, अनुदाने आणि थकबाकीमुळे वितरण कंपन्यांवर आर्थिक ताण वाढतो. सरकारकडून अनुदानाची रक्कम वेळेवर न मिळाल्यास पायाभूत सुविधांच्या देखभालीवर परिणाम होतो. परिणामी ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे ऊर्जा क्षेत्रात आर्थिक शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल आवश्यक आहे.

आज भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. उद्योग, डेटा सेंटर, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रिक वाहने आणि डिजिटल सेवा यामुळे विजेची मागणी सातत्याने वाढत आहे. अशा वेळी उपलब्ध वीज प्रथम कोणाला द्यावी, असा प्रश्न निर्माण होतो. मोठ्या उद्योगांना वीज आधी द्यावी की ग्रामीण रुग्णालयांना, औद्योगिक कॉरिडॉरना की सिंचन प्रकल्पांना असे प्रश्न उभे राहतात. हा केवळ आर्थिक प्रश्न नाही, तर सामाजिक न्यायाचाही प्रश्न आहे.

उद्योगांना वीज मिळाली तर उत्पादन वाढेल, रोजगार निर्माण होतील आणि महसूल वाढेल हा युक्तिवाद योग्य आहे; पण दुसरीकडे ग्रामीण दवाखान्यात वीज नसल्यामुळे शस्त्रक्रिया थांबत असतील, विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नसेल किंवा शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी मिळत नसेल तर विकासाचे चित्र अपूर्ण राहते. म्हणूनच ऊर्जा धोरणाने आर्थिक वाढ आणि सामाजिक समता या दोन्ही उद्दिष्टांचा समतोल साधला पाहिजे. भारताने सौरऊर्जेच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि इतर राज्यांमध्ये मोठे सौरऊर्जा प्रकल्प उभे राहत आहेत.

छतावरील सौरऊर्जा, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा साठवणूक यांसारख्या क्षेत्रांमध्येही मोठ्या संधी उपलब्ध आहेत; मात्र या हरित क्रांतीचा लाभ फक्त मोठ्या कंपन्या आणि शहरी भागांपुरता मर्यादित राहिल्यास ऊर्जा क्षेत्रातील जुन्या विषमता कायम राहतील. भविष्यातील ऊर्जा धोरणात विकेंद्रित ऊर्जा व्यवस्थेला अधिक महत्त्व द्यावे लागेल. गावागावांमध्ये सौर मायक्रोग्रिड, कृषी सौरपंप, स्थानिक ऊर्जा साठवणूक आणि स्मार्ट वितरण व्यवस्था विकसित करावी लागेल. त्यामुळे केवळ राष्ट्रीय ग्रिडवरचा ताण कमी होणार नाही, तर दुर्गम भाग अधिक आत्मनिर्भरही होतील.

यासोबतच वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण, स्मार्ट मीटर, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मागणी व्यवस्थापन आणि हवामान बदलाशी सुसंगत पायाभूत सुविधा उभारणेही तितकेच आवश्यक आहे. ऊर्जा न्यायाचा आणखी एक पैलू म्हणजे परवडणारे वीजदर. वाढते उत्पादन आणि आधुनिक तंत्रज्ञान असूनही अनेक कुटुंबांसाठी वीजबिलाचा खर्च अजूनही मोठा आहे. स्वस्त आणि विश्वासार्ह वीज हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार मानण्याची वेळ आता आली आहे. शिक्षणाचा अधिकार, आरोग्याचा अधिकार किंवा पिण्याच्या पाण्याप्रमाणेच ऊर्जा उपलब्धता ही विकासाची पूर्वअट आहे.

आज भारताने ऊर्जासुरक्षेच्या दिशेने मोठी मजल मारली आहे. आता त्याच ऊर्जेचे न्याय्य वितरण ही पुढची लढाई आहे. सरकार, वितरण कंपन्या, नियामक संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी समन्वयाने काम केल्यासच उत्पादनातील वाढ समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचेल. शेवटी, ऊर्जा क्षेत्रातील यशाची खरी मोजमापे गीगावॅट, रोहित्रे किंवा ग्रिड विस्तार यापुरती मर्यादित नसतात. ती एखाद्या दुर्गम गावातील विद्यार्थ्याला रात्री अभ्यासासाठी मिळणाऱ्या प्रकाशात, शेतकऱ्याच्या पिकाला वेळेवर मिळणाऱ्या पाण्यात, ग्रामीण रुग्णालयातील अखंडित वीजपुरवठ्यात आणि छोट्या उद्योगाला मिळणाऱ्या विश्वासार्ह ऊर्जेमध्ये दडलेली असतात. भारताची ऊर्जा यात्रा 'ऊर्जा सुरक्षे'पासून सुरू झाली आहे. आता ती 'ऊर्जा न्याय' या अधिक व्यापक आणि लोकाभिमुख ध्येयाकडे पोहोचली, तरच विकासाचा प्रकाश खऱ्या अर्थाने प्रत्येक घरापर्यंत पोहोचेल.

– प्रा. सुखदेव बखळे

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

# संत रोहिदास महाराजांच्या ६५०व्या जयंतीनिमित्त समरसता संकल्प अभियानांतर्गत ७ ऑगस्ट रोजी कलश पूजन

## कलश पूजन व दर्शनाचा लाभ घेण्याचे आमदार नारायण भाऊ कुचे यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - जगतगुरू संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज यांच्या ६५०व्या जयंतीनिमित्त 'समरसता संकल्प अभियान' अंतर्गत ७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता कलश पूजन व कलश वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आमदार नारायण कुचे यांनी पत्रकार परिषदेत देण्यात आली.







हा उपक्रम सामाजिक समरसता, बंधुभाव आणि संत रोहिदास महाराजांच्या समतेच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला आहे. देशभरात संत रोहिदास महाराजांच्या ६५०व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन होत असून, हा सोहळा त्याच अभियानाचा एक भाग असल्याचे आमदार नारायण भाऊ कुचे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी संत रोहिदास महाराजांच्या पावन जन्मभूमी काशी (वाराणसी) येथून आणलेल्या पवित्र कलशांचे पूजन करून त्यांचे भाविकांना वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मा.आ. रविंद्र (दादा) चव्हाण यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाचे आयोजन मा.आ. श्री. नारायण भाऊ कुचे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. कलश पूजन : संत रोहिदास महाराज मंदिर, जेन-सेक्टर, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे होणार असून, कलश वितरण : सारा कारखलीवाल परिसर, सोहम मोटर्सजवळ, मुकुंदवाडी, जालना रोड सिडको, छत्रपती संभाजीनगर. येथे होणार आहे, असे आमदार नारायण भाऊ कुचे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. पत्रकार परिषदेत आयोजकांनी सांगितले की, संत रोहिदास महाराजांनी दिलेला समता, बंधुता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सर्व नागरिकांनी या कार्यक्रमात उपस्थित राहून सामाजिक समरसतेचा संदेश बळकट करावा, असे आवाहन करण्यात आले. पत्रकार परिषदेला मंत्री अतुल सावे, माजी अर्थराज्यमंत्री भागवत कराड, आमदार अनुराधा चव्हाण, माजी आमदार संजय केणेकर तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रावणाच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकला वाहतूक नियोजनावर भर भाविकांच्या सुविधांसाठी प्रशासन सज्ज



नाशिक, दि. ६ (प्रतिनिधी) - श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर नगरीत येणाऱ्या लाखो भाविकांसाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी त्र्यंबकेश्वर नगरपरिषद आणि पोलिस प्रशासनाने संयुक्त नियोजन सुरू केले आहे. नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार आणि उपनगराध्यक्षा वेदिका पाटणकर यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत विविध विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

**भाविकांच्या सुविधांसाठी प्रशासन सज्ज**

श्रावण महिन्यात विशेषतः तिसऱ्या सोमवारी होणाऱ्या ब्रह्मगिरी प्रदक्षिणेसाठी मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होते. मात्र, संपूर्ण महिनाभर शहरात भाविकांची वदर्ळ कायम असल्याने सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवणे, पथदिवे दुरुस्त करणे, धोकादायक विजेच्या तारा हटवणे, जुन्या इमारती आणि धोकादायक झाडांवर उपाययोजना करणे, तसेच शुद्ध पिण्याचे पाणी आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**त्र्यंबकला वाहतूक नियोजनावर भर** - दरम्यान, पोलिस प्रशासन, रिक्षा युनियन आणि स्थानिक गाइड यांच्यासोबतही स्वतंत्र बैठक घेण्यात आली. श्रावण काळात वाहतूक कोंडी टाळणे, रिक्षा अधिकृत ठिकाणीच उभ्या करणे, तसेच भाविकांची फसवणूक किंवा गैरवर्तन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला. श्रावण महिन्यात त्र्यंबकेश्वर नगरी भाविकांच्या स्वागतासाठी पूर्णपणे सज्ज असून, सुरक्षित आणि सुकर दर्शनासाठी प्रशासनाने सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# प.पू. पारसमुनी गुरुदेव यांच्या चातुर्मासात ऐतिहासिक तपमहोत्सव; ७ ऑगस्ट रोजी मासक्षमण पूर्णाहुती



कु. सारीकाबेन मेहता, कु. दिपाबेन पारसजी लोढा, सौ. राणीबेन सुरेशजी संचेती, सौ. सिमाजी सचीनजी बोरा, सौ. प्रितीजी हिरेणजी राणपरीया, श्री. पोपटलालजी संकलेचा, श्री. रमेशजी रुणवाल, हिंगोली, श्री. प्रितेशजी महेंद्रजी रुणवाल

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - नवकार आराधक, तपसम्राट प.पू. पारसमुनी गुरुदेव व आदि चार संत यांच्या पावन सान्निध्यात तिवारी मंगल कार्यालय येथे सुरू असलेल्या चातुर्मासात विविध धार्मिक उपक्रम, तपश्चर्या आणि अखंड नवकार महामंत्र जपाचे आयोजन करण्यात आले असून, ७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या मासक्षमण पूर्णाहुती सोहळ्यास जैन समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पत्रकार परिषदेत करण्यात आले.

यावेळी श्री चंपक पारस गुरु चातुर्मास सेवा समितीचे अध्यक्ष मांगीलालजी फुलफगर, उपाध्यक्ष भागचंदजी मुगदिया, उपाध्यक्ष अजितजी सिसोदिया, महामंत्री दिलीपजी लुणावत तसेच कोषाध्यक्ष सौ. मनीषाताई भंसाली उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत सांगण्यात आले की, २९ जुलै २०२६ पासून सुरू झालेल्या या चातुर्मासात जैन धर्मातील सम्यक ज्ञान, सम्यक दर्शन, सम्यक चारित्र आणि सम्यक

**श्री चंपक पारस गुरु चार्तुमास सेवा समिती, छत्रपती संभाजीनगर**

तप या चार मूलभूत तत्त्वांचा प्रसार केला जात आहे. जैन साधू-साध्वी समाजाला तप, त्याग आणि संयमाचे महत्त्व पटवून देत असून, प.पू. पारसमुनी गुरुदेव स्वतः कठोर तपश्चर्या करून भाविकांना प्रेरणा देत आहेत.

प.पू. पारसमुनी गुरुदेव यांनी गेल्या ५६ वर्षांच्या साधुजीवनात ६१ वेळा मासक्षमण, तर आदित्यमुनी महाराजांनी ३९ वेळा मासक्षमण तपश्चर्या पूर्ण केली असून, यावर्षीच्या चातुर्मासातही दोघांची मासक्षमण तपश्चर्या सुरू असल्याची माहिती देण्यात आली. सन २००५ मध्ये मुंबईतील योगीनगर येथे ११४, २००४ मध्ये चेन्नई येथे १११ आणि २०१७ मध्ये पाचोरा येथे १०२ मासक्षमण तपश्चर्या झाल्याचा उल्लेखही यावेळी करण्यात आला. चातुर्मासादरम्यान दररोज सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत तब्बल १८ तास अखंड नवकार महामंत्राचा जप सुरू असून, या आध्यात्मिक साधनेचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

तपमहोत्सवानिमित्त आठ दिवसांचे एकासन व्रत, तीन दिवसांचे उपवास व्रत तसेच पूर्णाहुतीच्या दिवशी किमान १००८ भाविकांनी उपवास करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, एकाच वेळी आठ मासक्षमणची पूर्णाहुती छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रथमच होत असल्याने हा ऐतिहासिक आणि दुर्मिळ धार्मिक सोहळा ठरणार आहे, असे आयोजकांनी नमूद केले.

पत्रकार परिषदेत जैन समाजातील सर्व भाविकांनी चातुर्मासातील विविध धार्मिक कार्यक्रम, तपश्चर्या आणि ७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या मासक्षमण पूर्णाहुती सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून अनुमोदना द्यावी, असे आवाहन श्री चंपक पारस गुरु चातुर्मास सेवा समितीच्या वतीने करण्यात आले.

# सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची खासदार संदिपान भूमरे यांनी घेतली सदिच्छा भेट



नवी दिल्ली, दि. ६ (वृत्तसंस्था) – केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री मा. मुरलीधर मोहोळ यांची आज नवी दिल्ली येथे छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भूमरे यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचा सर्वांगीण विकास, सहकारी संस्थांचे बळकटीकरण तसेच शेतकरी, सभासद आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

खासदार संदिपान भूमरे यांनी जिल्ह्यातील सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, विविध सेवा सहकारी संस्था, कृषी प्रक्रिया उद्योग, दुग्ध व्यवसाय, साखर व इतर सहकार क्षेत्राशी संबंधित उपक्रमांना केंद्र शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा, यासाठी आवश्यक सहकार्य करण्याची विनंती केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे केली.

यावेळी सहकार क्षेत्रात आधुनिकीकरण, डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन, शेतकरी उत्पादक संस्थांना, प्राथमिक कृषी पतसंस्था सक्षम करणे, कृषी मूल्यवर्धन, साठवणूक सुविधा, ग्रामीण रोजगारनिर्मिती तसेच सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला गती देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र शासनामार्फत आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. तसेच केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ जिल्ह्यातील सहकारी संस्थांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. खासदार संदिपान भूमरे यांनी सहकार क्षेत्र अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी केंद्र शासनाशी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. या भेटीमुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण : छत्रपती संभाजीनगरात ९६.२८ टक्के गणना अर्जांचे वितरण पूर्ण

## अर्ज सादर करण्याची मुदत १७ ऑगस्टपर्यंत; नागरिकांनी संधीचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR 2026) मोहिमेला जिल्ह्यात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत ३२ लाख १६ हजार १६७ मतदारांपैकी ३० लाख ९६ हजार ६३१ (९६.२८ टक्के) मतदारांना गणना (Enumeration) अर्जांचे वितरण पूर्ण झाले आहे. तसेच प्राप्त अर्जांपैकी २५ लाख ३ हजार ४३२ (७७.८४ टक्के) अर्जांचे डिजिटायझेशनही पूर्ण करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिलेल्या माहितीनुसार, अधिकाधिक मतदारांना अर्ज भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी गणना अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ८ ऑगस्ट २०२६ ऐवजी १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. ज्या मतदारांनी अद्याप अर्ज भरलेला नाही, त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांच्याकडे गृहभेटीदरम्यान अथवा थेट अर्ज जमा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय प्रगतीनुसार वैजापूर विधानसभा मतदारसंघात १०० टक्के गणना अर्जांचे वितरण पूर्ण झाले आहे. डिजिटायझेशनमध्ये कन्नड (९०.७७ टक्के) आणि वैजापूर (९०.७९ टक्के) हे मतदारसंघ आघाडीवर आहेत.

विधानसभा मतदारसंघनिहाय अर्ज वितरण व डिजिटायझेशनची प्रगती पुढीलप्रमाणे आहे :

सिल्लोड – अर्ज वितरण ९९.८३ टक्के, डिजिटायझेशन ८५.७१ टक्के

कन्नड – अर्ज वितरण ९९.८९ टक्के, डिजिटायझेशन ९०.७७ टक्के

फुलंब्री – अर्ज वितरण ९६.६५ टक्के, डिजिटायझेशन ७७.३३ टक्के

औरंगाबाद (मध्य) – अर्ज वितरण ९३.२४ टक्के, डिजिटायझेशन ६२.४३ टक्के.

औरंगाबाद (पश्चिम) – अर्ज वितरण ९०.३३ टक्के, डिजिटायझेशन ६७.३५ टक्के.

औरंगाबाद (पूर्व) – अर्ज वितरण ८८.९० टक्के, डिजिटायझेशन ६२.६३ टक्के.

पैठण – अर्ज वितरण ९९.४० टक्के, डिजिटायझेशन ८५.५० टक्के.

गंगापूर – अर्ज वितरण ९९.८५ टक्के, डिजिटायझेशन ८२.५५ टक्के.

वैजापूर – अर्ज वितरण १०० टक्के, डिजिटायझेशन ९०.७९ टक्के.

जिल्ह्यातील ३,२६४ बूथ लेव्हल अधिकारी (BLO) घरभेटीद्वारे गणना अर्जांचे वितरण, पडताळणी तसेच अर्ज संकलनाचे काम युद्धपातळीवर करीत आहेत. जिल्हा निवडणूक कार्यालयाने सर्व पात्र मतदारांना आवाहन केले आहे की, १७ ऑगस्ट २०२६ या वाढीव मुदतीपूर्वी आवश्यक कागदपत्रांसह गणना अर्ज संबंधित इङज यांच्याकडे सादर करावा. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत अचूक व अद्ययावत राहण्यासाठी नागरिकांनी या विशेष पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी.सी. आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर यांनी केले आहे.

# घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ नुसार १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांना स्वतःच प्रक्रिया करणे बंधनकारक

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) – शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. "Solid Waste Management Rules 2026" च्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शहरातील Bulk Waste Generator (BWG) तसेच Event Waste Management यासाठी स्वतंत्र व कडक नियम ावली लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या नव्या नियमांनुसार, ज्या आस्थापनांकडून दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा अधिक कचरा निर्माण होतो, अशा सर्व संस्थांना यापुढे स्वतःच त्यांच्या कचऱ्याची प्रक्रिया करणे बंधनकारक राहणार आहे. यामध्ये ओला कचरा, सुका कचरा तसेच इतर प्रकारच्या कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण करून त्यावर जागेवरच प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. कचऱ्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन करण्यासाठी संबंधित संस्थांनी कंपोस्टिंग युनिट, बायोगॅस प्लांट किंवा इतर प्रक्रिया यंत्रणा उभारणे आवश्यक राहील.

तसेच, सर्व Bulk Waste Generator यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (CPCB) EBWGR पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेमुळे कचऱ्याचे उत्पादन, वर्गीकरण आणि प्रक्रिया यावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होणार आहे.

महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे शहरातील मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या हॉटेल्स, विवाह समारंभ स्थळे, फंक्शन हॉल्स, मॉल्स, व्यापारी संकुले, शैक्षणिक संस्था तसेच विविध उद्योग–आस्थापनांना हा नियम लागू होणार आहे. महानगरपालिकेच्या प्राथमिक अंदाजानुसार शहरात सध्या २०० पेक्षा अधिक आस्थापने दररोज १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करतात.

या सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**Event Waste Management साठीही कडक अट–**

यासोबतच शहरात कोणताही सार्वजनिक किंवा खासगी कार्यक्रम आयोजित करताना कचरा व्यवस्थापनावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. कार्यक्रम आयोजकांना यापुढे महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहणार आहे. कार्यक्रमातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणानुसार शुल्क आकारले जाईल. तसेच कार्यक्रम संपल्यानंतर त्या ठिकाणी कचरा आढळल्यास संबंधित आयोजकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे शहरातील कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन प्रक्रिया केंद्रांवरील ताण कमी होईल, तसेच स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाला मोठा हातभार लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

छत्रपती संभाजीनगर शहराला स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्याचा आमचा संकल्प आहे. 'Solid Waste Management Rules 2026' अंतर्गत घेतलेले हे निर्णय शहराच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांनी जबाबदारी स्वीकारून स्वतःच कचऱ्याची प्रक्रिया करणे ही काळाची गरज आहे. तसेच कोणत्याही कार्यक्रमामध्ये कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी आयोजकांनी प्राधान्याने पार पाडली पाहिजे. नियमांचे उल्लंघन सहन केले जाणार नाही.

सर्व नागरिक, व्यापारी आणि आस्थापनांनी प्रशासनाला सहकार्य करून 'स्वच्छ आणि हरित छत्रपती संभाजीनगर' घडविण्यात आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले. महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे शहरात स्वच्छतेची नवी दिशा निर्माण होणार असून नागरिक आणि आस्थापनांनी यामध्ये सकारात्मक सहभाग घेणे अत्यंत गरजेचे आहे.

# वैजापूर विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षणाचे १०० टक्के काम पूर्ण; छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रथम, विभागात द्वितीय क्रमांक

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) – भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR-2026) अंतर्गत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली ११२–वैजापूर विधानसभा मतदारसंघाने घरोघरी सर्वेक्षण (House-to-House Survey) आणि डिजिटायझेशनचे १०० टक्के काम यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. दिनांक ५ ऑगस्ट २०२६ च्या अधिकृत अहवालानुसार या उल्लेखनीय कामगिरीमुळे वैजापूर विधानसभा म तदारसंघाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रथम, तर छत्रपती संभाजीनगर विभागात द्वितीय क्रमांक मिळिवला आहे.

निवडणूक प्रक्रियेसारख्या अत्यंत महत्त्वाच्या, कालबद्ध आणि वैधानिक जबाबदारीचे नियोजनबद्ध पद्धतीने प्रभावीपणे नियोजन करून संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेने ही कामगिरी साध्य केली आहे.

या मोहिमेचे नेतृत्व मतदार नोंदणी अधिकारी **(ERO)** तथा उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण दमोधार जऱ्हाड यांनी केले.

सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी **(AERO)** म्हणून तहसीलदार सुनील रमेश सावंत यांच्यासह उपविभागीय कृषी अधिकारी आनंद व्यंकट गंजेवार, गट विकास अधिकारी ज्ञानदेव अर्जुन जायभाये, नायब तहसीलदार (महसूल–२) रामेवर बाबुराव महाजन, तालुका कृषी अधिकारी व्यंकट सायना ठक्के, मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर भागवत उत्तम बिघोत, गट शिक्षणाधिकारी हेमंत केशव उशीर तसेच नायब तहसीलदार (महसूल–१) सुरज गोरख कुमावत यांनी समन्वयाची जबाबदारी पार पाडली.

निवडणूक शाखेच्या केंद्रीय पथकामध्ये नायब तहसीलदार (निवडणूक) दत्तात्रय महादू कांबळे, महसूल सहाय्यक सोमनाथ कमलाकर म्हेत्रे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ओंकार जायराम पारधी, ग्राम महसूल अधिकारी हिनाकौसर नजीर चौगुले, सहशिक्षक तुकाराम पांडुरंग कानवडे तसेच डाटा एन्ट्री ऑपरेटर विजय दत्तात्रय वाळूज यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. या उपक्रमात ३५ बीएलओ पर्यवेक्षक, ३५३ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी **(BLO)** आणि २८४ बीएलओ सहकारी यांनी बीएलओ ॲप व निवडणूक प्रणालीच्या माध्यमातून प्रभावीपणे कार्य करून शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण केले.

अधिकृत डखठ स्थिती अहवालानुसार वैजापूर विधानसभा मतदारसंघातील एकूण मतदारसंख्या ३ लाख १५ हजार ६०७ इतकी असून सर्व ३ लाख १५ हजार ६०७ मतदारांना इन्युम रेशन फॉर्मचे वितरण पूर्ण झाले आहे. तसेच २ लाख ८६ हजार ५२८ फॉर्मचे डिजिटायझेशन करण्यात आले असून एकूण कामाची शंभर टक्के पूर्तता झाली आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यानंतर २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्राप्त दावे व हरकतींवर सुनावणी करून त्यांची निकाली प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# महाडीबीटी २.० पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया सुरू; विजाभज, विमाप्र व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी नव्या महाआयडीद्वारे अर्ज करावेत

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) – इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी विविध शिष्यवृत्ती योजनांच्या ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस महाडीबीटी २.० (MahaDBT 2.0) या नव्या प्रणालीवर प्रारंभ झाला आहे. महाराष्ट्र राज्यातील विजाभज (तगछढ), विमाप्र (SBC) व इतर मागास प्रवर्ग (OBC) तसेच इतर पात्र विद्यार्थ्यांनी नव्याने महाआयडी (Maha ID) तयार करून विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

महाडीबीटी २.० ही राज्य शासनाची अद्ययावत डिजिटल प्रणाली असून, शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि वेगवान करण्याच्या उद्देशाने ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीची लाभरक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न (Aadhaar Seeded) बँक खात्यात थेट जमा केली जाणार असल्यामुळे अर्ज भरताना आधार क्रमांक, बँक खाते, मोबाईल क्रमांक, ई–मेल, पत्ता व इतर वैयक्तिक माहिती अचूक आणि अद्ययावत असणे आवश्यक आहे.

या पोर्टलद्वारे मॅट्रिकोत्तर (Post-Matric) व मॅट्रिकपूर्व (Pre-Matric) स्तरावरील विविध शिष्यवृत्ती योजना, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, गुणवत्ता शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता, फ्रीशीप, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती तसेच PM-YAS>AS>VI मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेसह अनेक योजनांसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी तसेच मुलींसाठी स्वतंत्र शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती योजनांचाही त्यामध्ये समावेश आहे.

**महाआयडी तयार करणे बंधनकारक**

महाडीबीटी २.० प्रणालीवर अर्ज करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने नव्याने महाआयडी तयार करणे बंधनकारक आहे. पूर्वीच्या महाडीबीटी पोर्टलवरील युजर आयडी व पासवर्ड या प्रणालीत ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. आधार आधारित लॉगिनद्वारे नवीन तसेच नूतनीकरण (Renewal) अर्ज करता येणार आहेत. नूतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी लॉगिन केल्यानंतर 'माझा अर्ज नूतनीकरण करावा' हा पर्याय निवडावा.

**आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत**

अर्ज करताना विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रम ाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रिका तसेच संबंधित योजनेनुसार आवश्यक असलेली इतर कागदपत्रे स्पष्ट पीडीएफ स्वरूपात अपलोड करावीत. अर्ज भरताना जात, प्रवर्ग, म हाराष्ट्राचे रहिवासी असल्याचा तपशील, कौटुंबिक उत्पन्न, दिव्यांगत्व आदी सर्व माहिती काळजीपूर्वक भरावी. अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रिंट अथवा पीडीएफ प्रत जतन करून ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**महाविद्यालयांसाठीही नवी कार्यपद्धती –** महाडीबीटी २.० प्रणालीम ध्ये महाविद्यालयांसाठीही नवी कार्यपद्धती लागू करण्यात आली आहे. आता केवळ प्राचार्य लॉगिन उपलब्ध राहणार असून, लिपीक लॉगिनची सुविधा बंद करण्यात आली आहे. महाविद्यालयांनी आपली प्रोफाईल, अभ्यासक्रमनिहाय शुल्क रचना, प्रवेश क्षमता व मान्यतेसंदर्भातील माहिती पोर्टलवर अद्ययावत करणे आवश्यक आहे. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित न ठेवता विहित कालावधीत पडताळणी करून पुढे पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहणार आहे. लॉगिन किंवा तांत्रिक अडचणी असल्यास संबंधित शैक्षणिक विभागाशी संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**शाळांनी विद्यार्थ्यांना सहकार्य करावे–** मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्यासाठी संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांनी गट शिक्षण अधिकारी (BEO) यांच्याशी समन्वय साधून विद्यार्थी व पालकांना आवश्यक सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**शुल्क आकारू नये**

इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क आकारू नये, अशा स्पष्ट सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच महाविद्यालयांनी आपल्या अभ्यासक्रमांची माहिती, शुल्क संरचना व मान्यतेसंदर्भातील तपशील संबंधित शैक्षणिक यंत्रणेमार्फत पोर्टलवर अद्ययावत करून घ्यावा.

**अर्ज प्रक्रिया –** विद्यार्थ्यांनी म हाडीबीटी २.० पोर्टलवर आधार आधारित लॉगिन करून पात्र योजनांची माहिती पाहावी. संबंधित योजनेसमोरील Apply पर्याय निवडून वैयक्तिक माहिती, शैक्षणिक तपशील व आवश्यक कागदपत्रे अपलोड करून अर्ज ऑनलाईन सादर करावा. अर्ज सादर झाल्यानंतर त्याची प्रत भविष्यातील संदर्भासाठी जतन करून ठेवावी. शिष्यवृत्ती योजनांबाबत अधिक माहितीसाठी ०२२–४९१५०८०० अथवा १८००–१०२–५३९९ या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधता येईल. तसेच helpdesk@mahadbt.gov.in या ई–मेलवरही संपर्क साधता येणार आहे. तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचणी असल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगिनमधून स्क्रीनशॉटसह ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभागाने कळवले आहे.

# महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष यांचा उद्या मनपा दौरा

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग मुंबई उपाध्यक्ष मा.श्री.मुकेश सोनु सारवान यांचा उद्या छत्रपती संभाजीनगर दौरा असून ते उद्या दिनांक ०७ ऑगस्ट रोजी मनपा मुख्यालय येथे सफाई कामगारांच्या समस्यांबाबत आढावा बैठक घेणार आहेत.

यात प्रामुख्याने शासन निर्णयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना बाबत २५ वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा झालेल्या सफाई कामगारांना मालकी तत्वावर मोफत सदनिका देणे बाबत सद्यस्थितीचा आढावा. शासन निर्णयातील दूषित गटारा मध्ये काम करताना मृत्यू पावलेल्या /कायम अपंगत्व/अपंगत्व आलेल्या सफाई कामगारांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत सद्यस्थितीत प्रकरणाची माहिती. शासन निर्णयातील तरतुदीनुसार वारसा हक्काच्या प्रलंबित प्रकरणांची माहिती व सफाई कामगारांचे मंजूर पदे,भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती. तसेच महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा आढावा घेणार आहेत.

# प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांची मनपा प्रियदर्शनी विद्यालयास भेट



छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी महानगरपालिकेच्या केंद्रीय प्राथमिक विद्यालय प्रियदर्शनी या शाळेत भेट दिली व शाळेतील विद्यार्थ्यांचे विविध उपक्रम आणि गुणवत्ता बघून शाळेचे मुख्याध्यापक संजीव सोनार आणि सर्व शिक्षक वृंद यांचे कौतुक केले . प्रारंभी लेझीम पथक व औक्षणाने आलेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी तुषार महाजन उपसचिव शालेय शिक्षण विभाग मुंबई आणि एम. जी. आरेसवड अव्वर सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त अंकुश पांढरे,

मिपा संचालक प्रकाश मुकुंद ,विभागीय शिक्षण उपसंचालक कैलास दातखिळ, प्राचार्य डायट डॉ.राजेंद्र कांबळे, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद श्रीमती अश्विनी लाटकर, वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. सतीश सातव, सहाय्यक शिक्षण संचालक सुनील पोलास, शिक्षण उपनिरीक्षक श्री भारत पालवे,यांची प्रमुख उपस्थिती होती.

शाळेतील सिम्फनी बँड पथकाने विविध गीते सादर करून व जय जय महाराष्ट्र माझा व स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत केले.मान्यवरांचे पुस्तक देऊन मनपा अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील व उपायुक्त अंकुश पांढरे यांनी स्वागत केले.

रणजीत सिंह देवल यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्यासोबत संवाद साधून शाळेमधील असलेल्या विविध उपक्रमाची माहिती करून घेतली.


डी मार्ट तर्फे संचलित कॉम्प्युटर लॅब मध्ये विद्यार्थी करत असलेल्या प्रात्यक्षिकांचे त्यांनी प्रशंसा केली. शाळेमधील सीबीएसई माध्यम ाच्या वर्गांना व मराठी माध्यमाच्या वर्गांना भेटी दिल्यात . तसेच क्रीडा व संगीत विभागांमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी बक्षीस दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी देसले व आभार प्रदर्शन प्रशासन अधिकारी संजीव सोनार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे विस्तार अधिकारी विजय कोल्हे, रमेश ठाकूर स्वाती डिडोरे,मोनिका राठोड,रश्मी होनमुटे, शशिकांत उबाळे,प्रणिता पारनेरे, वैशाली गुळवे, संगीता चौधरी, प्रकाश इंगळे, सचिन लवेरा, काकासाहेब जाधव, प्रशांत निकाळजे, हर्ष नरवडे यांनी परिश्रम घेतले.

# शेख हनिफोद्दीन यांचे निधन



वैजापूर, दि. ६ (प्रतिनिधी) – येथील पालिकेच्या सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक शेख हनिफोद्दीन यांचे अल्पशा आजाराने गुरुवार सकाळी (ता०६) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी १२–०० वाजता मुस्लिम स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले.त्यांना माजी उपनगराध्यक्ष मजिद कुरेशी, नगरसेवक विशाल शेठ संचेती, काझी हाफीजोद्दीन, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी ठा. धोंडिरामसिंह राजपूत, सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचे शालेय समिती अध्यक्ष व जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा,डॉ.एस.एम. जोशी, डॉ. सुहास रहाणे, डॉ.जयसिंह मरमट, राजू काझी, डॉ. तोष्णीवाल,डॉ.अश्विन जोशी,हिकमतउल्ला व पालिका शाळांचे मुख्याध्यापक, सर्वश्री गणवीर, साळुंकर, वसावे, जाधव, व्ही.एन.ढाकरे, भगवानसिंह राजपूत यांनी श्रद्धांजली अर्पण केली. मृत्य समयी शेख हनिफोद्दीन यांचे वय ६१वर्ष होते. त्यांच्या मागे पत्नी,दोन विवाहित मुली,व एक विवाहित मुलगा,सून नातवंडे असा परिवार आहे.

# गोविंद बासरकर यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) – सिडको छ ४, सेक्टर F, प्लॉट क्रमांक ८१ येथील रहिवासी, श्री. गोविंद रामकृष्णराव बासरकर यांचे दिनांक ०५/०८/२०२६ बुधवार रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पक्षात श्रीकांत व प्रशांत हे मुले व सुशील व सुनील बासरकर यांचे ते काका होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# खेळाडूंसाठी विभागीय क्रीडा संकुलामध्ये उच्च दर्जाच्या सुविधा आणि सुरक्षितता प्रदान करण्याचे विभागीय आयुक्तांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेतून विकसित मराठवाडा घडविताना क्रीडा क्षेत्रालाही प्राधान्य देण्यात येत असून विभागीय क्रीडा संकुल हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण केंद्र बनविण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा आणि सुरक्षितता उपलब्ध करून देण्याचे निर्देश विभागीय आयुक्त तथा विभागीय क्रीडा संकुल समितीचे उपाध्यक्ष जी. श्रीकांत यांनी दिले.



स्मार्ट सिटी कार्यालयात आयोजित विभागीय क्रीडा संकुल समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., विभागीय क्रीडा संकुलचे उपसंचालक तथा समितीचे सदस्य सचिव शेखर पाटील, संबंधित विभागांचे अधिकारी आणि कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जी. श्रीकांत यांनी सांगितले की, मुख्यमंत्री यांच्या विकसित महाराष्ट्र धोरणानुसार मराठवाड्यात उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी क्रीडा संकुलात आधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंना सक्षम बनविण्यासाठी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विभागीय क्रीडा संकुलातील ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅकचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून त्याच कालावधीत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

ट्रॅकचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासह विभागीय निपुणता केंद्र, लॉन टेनिस, कुस्ती, बॅडमिंटन, बॉक्सिंगसाठी इनडोअर हॉल, बास्केटबॉल, फुटबॉलसाठी मैदाने, खेळाडूंची निवासी व्यवस्था, दर्जेदार क्रीडा साहित्य, रंगरंगोटी, विद्युत दुरुस्ती, स्वच्छतागृहांची सुधारणा तसेच 'मिशन लक्षवेध' अंतर्गत वसतिगृहांच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. या कामांसाठी आवश्यक निधी मिळावा यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करण्यासही सांगितले.

यापूर्वी दिलेल्या सूचनांनुसार प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून क्रीडा संकुलात विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन, खेळाडूंसाठी दर्जेदार निवासी व्यवस्था, आरोग्य सुविधा आणि स्वच्छता सुनिश्चित करण्यावरही त्यांनी भर दिला.

खेळाडूंच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने क्रीडा संकुल परिसर व आजूबाजूच्या भागातील भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच परिसरात भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्यासाठी जमणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेशही संबंधित यंत्रणांना देण्यात आले.

त्याचबरोबर संबंधित यंत्रणांनी क्रीडा संकुलातील पार्किंगची सुविधा अद्यावत करण्यासाठी नियोजन करावे. संकुलात येणाऱ्या सर्व गाड्यांकरिता शुल्क निश्चित करून पे अँड पार्कची सुविधा सुरु करण्यात यावी अशा सूचना त्यांनी दिल्या. त्याचबरोबर नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या सिंथेटीक ट्रॅक वं फुटबॉल मैदानाच्या वापरासाठी प्रमाणित कार्य पद्धती तयार करण्यात यावी व फक्त खेळाडूंकरिताच ट्रॅक व फुटबॉल मैदान या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या अशाही सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी यावेळी दिल्या.

# 'वंदे मातरम्'मधून स्वातंत्र्याचा गौरव आणि देशभक्तीचा जागर

## सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे १५ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे देशभक्तीपर गीत व नृत्यावर आधारित विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- ऑगस्ट २०२६ : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त 'वंदे मातरम्' या देशभक्तीपर गीत व नृत्यावर आधारित विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता तापडिया नाट्यमंदिर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास सर्व नागरिकांसाठी विनामूल्य प्रवेश असून, देशभक्तीचा उत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भारताचा स्वातंत्र्यदिन हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमान, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देणारा दिवस आहे. स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, शौर्य आणि बलिदानाची कृतज्ञतेने आठवण करून देत राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि संविधानिक मूल्यांप्रती निष्ठा दृढ करण्याचा संदेश या कार्यक्रमातून दिला जाणार आहे.

'वंदे मातरम्' या कार्यक्रमामध्ये देशभक्तीपर गीत, संगीत आणि नृत्याविष्कारांच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा गौरवशाली इतिहास, राष्ट्रभक्तीची प्रेरणा, विविधतेतील ऐक्य आणि भारतीय संस्कृतीचे वैभव प्रभावीपणे सादर करण्यात येणार आहे. संगीत आणि नृत्याचा सुरेल संगम अनुभवण्याची संधी या कार्यक्रमातून रसिकांना लाभणार आहे.

या कार्यक्रमात राहुल जेठे, मंगेश सुरडकर, प्रिया पवार आणि अमोल जेठे हे गायक देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करणार असून, द ब्लेझ डान्स ग्रुप देशभक्तीपर नृत्याविष्कार सादर करणार आहे. या कलावंतांच्या प्रभावी सादरीकरणातून राष्ट्रप्रेम, शौर्य आणि भारतीयत्वाची भावना अधिक दृढ होणार आहे.

देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, राष्ट्रनायकांचे योगदान आणि राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. सदर कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. राज्यभर विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि राष्ट्रभावनेचा जागर करण्याचे कार्य सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत सातत्याने करण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगर व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, युवक, सांस्कृतिकप्रेमी आणि रसिकांनी या देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# रमाई आवास घरकुल योजना' नवीन लाभार्थ्यांना ऑनलाइन अर्जाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील कुटुंबांना हक्काचे घर उपलब्ध व्हावे यासाठी शासन निर्णय क्र.बीसीएच -२००९ /प्र.क्र.१५९ /मावक -२ /दिनांक ०९ मार्च २०१० आणि त्यानंतर निर्गमित झालेल्या सुधारित शासन निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत रमाई आवास घरकुल योजना राबविण्यात येते. राज्य शासनाच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणाऱ्या या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी २.५० लाख रुपयांचे अनुदान दिले जाते.

दिनांक ३० जुलै २०२६ रोजी संत एकनाथ रंगमंदिर येथे झालेल्या कार्यक्रमात पालकमंत्री यांनी केलेल्या घोषणेनुसार या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व रमाई आवास घरकुल योजनेचे उदिष्ट पूर्तीसाठी महानगरपालिकेने ऑनलाइन पद्धतीने नवीन लाभार्थी नोंदणीसाठी शुभारंभ करण्यात आला आहे. महानगरपालिका हद्दीतील पात्र नागरिकांनी महानगरपालिकेच्या अधिकृत https://chhsambhajinagarmc org या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज सादर करून या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जलयुक्त शिवार अभियान २.० च्या कामांना गती द्या; जलसंधारणाची कामे वेळेत पूर्ण करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत सुरू असलेली मृद व जलसंधारणाची कामे नियोजित वेळेत पूर्ण करून पावसाळ्यापूर्वी पूर्णत्वास न्यावीत. प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावून नाला खोलीकरणासह विविध जलसंधारण कामांना गती द्यावी. तालुकास्तरीय यंत्रणांनी परस्पर समन्वय राखून प्रभावीपणे काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जलयुक्त शिवार अभियान २.० च्या आढावा बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मित्रू पी. एम., उपवनसंरक्षक श्रीमती सुवर्णा माने, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके, जिल्हा जलसंधारण अधिकारी (जि.प.) कपिल बिडकर, वरिष्ठ भूवैज्ञानिक जीवन बेडवाल यांच्यासह महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत विभाग, वन विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जलसंपदा विभाग, पाटबंधारे विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, कृषी, महसूल, भूमी अभिलेख तसेच मृद व जलसंधारण विभागाचे जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) सहभागी झाले. बैठकीत जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार अभियान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०, 'कॅच द रेन' अभियान तसेच अ सेट मॅपिंग अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध विभागांकडून राबविण्यात येत असलेल्या जल संधारण उपचार व उपाययोजनांच्या प्रगतीचे परीक्षण करून आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देत नाला खोलीकरणाच्या कामांवर विशेष भर देण्यास सांगितले. येत्या पावसाळ्यात अधिकाधिक जलसंचय होण्यासाठी सर्व कामे दर्जेदार व नियोजित वेळेत पूर्ण करावीत. विविध विभागांनी परस्पर समन्वय राखून जलसंधारणाच्या कामांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच 'कॅच द रेन' पोर्टलवरील माहिती वेळेत अद्ययावत करणे, असेट मॅपिंगची कामे पूर्ण करणे आणि जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले.

# त्वचादानासाठी देशात सक्षम यंत्रणा उभारा; खासदार विनोद तावडेंची राज्यसभेत आग्रही मागणी

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी देशात त्वचादान आणि स्किन बँकिंगची व्यवस्था अधिक मजबूत करण्याची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस व राज्यसभा खासदार विनोद तावडे यांनी आज राज्यसभेत केले. या संवेदनशील मुद्द्याकडे सरकारचे लक्ष वेधताना त्यांनी संपूर्ण देशभरात त्वचादानासाठी व्यापक यंत्रणा उभारण्याची मागणी केली. तसेच नोटो अंतर्गत देशभरात स्किन बँक्सची स्थापना, कोल्ड-चेन नेटवर्कची उभारणी आणि याविषयीची जनजागृती वाढवण्याचे महत्त्वपूर्ण आवाहनही त्यांनी केंद्र सरकारला केले आहे.

विनोद तावडे म्हणाले की, गंभीर भाजलेल्या रुग्णांसाठी दान केलेली त्वचा ही एखाद्या संरक्षकासारखे काम करते. यामुळे रुग्णाच्या शरीराला संसर्ग होत नाही आणि शरीरातील पाणी कमी होत नाही. कायमस्वरूपी उपचार होईपर्यंत ही त्वचा रुग्णाचा जीव वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सरकारने नोटो (राष्ट्रीय अवयव आणि उती प्रत्यारोपण संघटना) च्या माध्यमातून अवयवदानासाठी चांगले काम केले आहे. मात्र, त्वचादानाबाबत अजूनही समाजात पुरेशी जनजागृती झालेली नाही. जर आपण स्किन बँक्सची संख्या वाढवली आणि संपूर्ण देशात त्वचा संकलनाची उत्तम व्यवस्था केली, तर हजारो रुग्णांना वेळेवर मदत मिळू शकेल, असे तावडे यांनी म्हटले आहे. त्वचादानाबाबतची सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, मृत्यूनंतर ६ तासांच्या आत हे दान करता येते आणि त्यासाठी रक्तगट जुळण्याची कोणतीही आवश्यकता नसते. यामध्ये केवळ त्वचेचा वरचा थर काढला जात असल्याने मृतदेहाचे विद्रूपीकरण होत नाही, शिवाय योग्य पद्धतीने जतन केलेली ही त्वचा ५ वर्षांपर्यंत वापरता येते.

# सार्वजनिक गणेशोत्सव व दुर्गा उत्सव मंडळांनी कायमस्वरूपी नोंदणी करावी; धर्मादाय सह आयुक्त कार्यालयाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे व सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळांनी आपल्या मंडळाची कायमस्वरूपी नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन धर्मादाय सह आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव व दुर्गा उत्सव साजरा करण्यासाठी वर्गणी गोळा करण्याची परवानगी मिळावी यासाठी दरवर्षी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१ (क) अंतर्गत मोठ्या संख्येने अर्ज सादर केले जातात. मात्र, ज्या मंडळांनी संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत कायमस्वरूपी नोंदणी करून घेतलेली असेल, त्या मंडळांना दरवर्षी कलम ४१ (क) अंतर्गत स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता राहत नाही.

कायमस्वरूपी नोंदणी झालेल्या मंडळांना उत्सवादरम्यान प्राप्त होणाऱ्या देणग्या, विविध वस्तू तसेच सोने, चांदी आदी मौल्यवान मालमत्तेचे नियमानुसार व पारदर्शक पद्धतीने व्यवस्थापन करणेही अधिक सुलभ होते. त्यामुळे मंडळाच्या प्रशासनात शिस्त, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होते. त्यामुळे धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व सार्वजनिक श्री गणेशोत्सव व श्री दुर्गादेवी उत्सव मंडळांनी आपापल्या मंडळाची कायमस्वरूपी नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन धर्मादाय सह आयुक्त कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

(पान १ वरुन)

## जात पडताळणी समितीचा निर्णय...

झाले का?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता.

ठाणे जिल्ह्यातील भाईंदरपाडा-ओवळे या भागातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील ११०० एकर जमिनीचा वाद माझ्याकडे सुरू होता. ही जागा आता वन विभागाच्या नावे करण्यात आली आहे. ही जागा आपली असल्याचा दावा खासगी दावेदारांनी केला होता. त्यांनी दाखल केलेल्या अर्धन्यायिक खटल्याचा निर्णय देण्यात आला असून ही जागा वन विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे, अशीही माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

## फडणवीस एका व्यक्तीमुळे नाही, अठरापगड...

नाईलाज आहे. कोणालाही दिलेले प्रमाणपत्र अवैध ठरवता येत नाही. तो निर्णय त्या सक्षम अधिकाऱ्याने घेतलेला आहे.''

चंद्रशेखर बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यास सांगितले असून त्यांची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली होती. यावर बोलताना दरेकर म्हणाले की, मला असं वाटतं मनोज जरांगे यांनी पाडण्यापेक्षा जोडण्याचं काम करावं. समाजा-समाजात विद्वेषाची दरी निर्माण करण्यापेक्षा विकासासाठी मेहनत घ्यावी. वाईट करायला फार काही अक्कल लागत नाही, मात्र चांगलं करायला खूप काही अक्कल लागते. सगळ्या जाती-धर्माला, समाजाला बरोबर घेऊन फडणवीस बहुजन, वंचितांना घेऊन काम करत आहेत. मनोज जरांगे यांचा सातत्याने सन्मान केला आहे. जेव्हा आंदोलन झाले तेव्हा त्यांच्याशी चर्चा केली आणि निर्णय घेतले. विखे पाटील किंवा प्रसाद लाड यांनीदेखील मागील काळात चर्चा केली. आजही सरकार मनोज जरांगे यांच्या सोबत चर्चेसाठी तयार आहे. मात्र त्यांनी विषय समजून घेतले पाहिजेत,'' असे त्यांनी म्हटले.

## सीजेपी सप्टेंबरपासून ''क्या बोलती पब्लिक''...

किंवा कुठला एक व्यक्ती सगळे प्रॉब्लेम सॉल्व्ह करेल, तर तो तुमच्याशी खोटं बोलत आहे. २०१४ मध्ये देशाशी असेच खोटे बोलण्यात आले होते की एक व्यक्ती देश बदलू शकेल, पण प्रत्यक्षात ''काशीची काशी झालेली आहे'' असा टोला त्यांनी लगावला. कोणताही एक व्यक्ती किंवा संस्था देशाचे सर्व प्रश्न सोडवू शकत नाही, म्हणूनच ज्या संघटनांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि सिव्हिल सोसायटीने पाठिंबा दिला, त्या सर्वांशी एकत्र येऊन एकजूट करण्यात येईल. आता देशाला सगळ्यांनी आपल्या राजकीय विचारसरणीच्या वर उठून, ''नागरिक म्हणून एकत्र येऊन देशात सुधार आणायची गरज आहे'' असे त्यांनी सांगितले.

## भाजपने देश लुटून उद्योगपतींच्या घशात...

भविष्य अंधारात गेले आहे, तर शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला असून महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न अधिक गंभीर बनले आहेत. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे समाजातील प्रत्येक घटक त्रस्त झाला आहे.

निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून मोठमोठी आश्वासने देण्यात आली, मात्र सत्तेत आल्यानंतर सुमारे एक कोटी महिलांना योजनेतून वगळण्यात आले, असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला. धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस मिळालेला नाही, कर्जमाफीची घोषणा फसवी ठरली असून त्याचा शेतकऱ्यांना कोणताही लाभ झालेला नाही, असेही त्यांनी सांगितले.

प्रत्येक कामात भ्रष्टाचार वाढला असून ४० टक्के कमिशनशिवाय काम होत नाही, असा आरोप करत त्यांनी गोसेखुर्द प्रकल्पाचाही उल्लेख केला. काँग्रेस सरकारच्या काळात मंत्री असताना गोसेखुर्द प्रकल्पासाठी पाच हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. त्यामुळे या भागातील सिंचनाला चालना मिळाली. मात्र आज प्रकल्पांची कामे संथ गतीने सुरू असून त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

## आंदोलन का झालं, का नाही याचं उत्तर...

कमर्शिअल बिझनेस नाही, जगण्याची गरज आहे. सगळ्याच दृष्टीने याचा आता विचार व्हायला हवा असे भागवत म्हणाले. मी आपल्या जागी काय करु शकतो याचा विचार व्हायला हवा. शिक्षणाचा भार आपल्या सर्वांनी देखील उभारला पाहिजे. पुढची पिढी आपण बनवण्यासाठी शिक्षण देत असतो, फक्त पैसे कमावण्यासाठी नाही. शिक्षणासाठी ६ टक्के आर्थिक तरतूद असावी ही मागणी रास्त असल्याचे मत मोहन भागवत यांनी व्यक्त केले. अंमलबजावणी व्हावी ही आग्रही मागणी नेहमीच असते. सरकारने सगळी व्यवस्था चालवली पाहिजे असं तर नाही आहे, मग आपण पण त्याचा भार उचलू शकतो असेही भागवत म्हणाले. एलजीबीटी समाजाचाच भाग आहे. समलिंगी विवाहाबाबत कायदा करण्याची गरज असल्याचे मत मोहन भागवत यांनी व्यक्त केले. तुम्ही यंत्रणा मिक्स करून नाही चालणार ती सुधारावी लागेल असेही ते म्हणाले.

## काम बंद केले ना, मग पगार घेणंही बंद करा

तुम्ही उपचार करण्यास नकार देताय? असा सवाल सुद्धा उपस्थित केला. रुग्णांना सेवा देत नाहीत हे छान वाटतं का? अशी विचारणा करत मुंबई हायकोर्टाने खडेबोल सुनावले. डॉक्टरांचा संप तातडीने मागे घेण्यात यावा, अशा शब्दात हायकोर्टाने निर्देश दिले. आम्ही तुमची बाजू ऐकून घेऊ पण संप तातडीने मागे घेणे आवश्यक असल्याचे हायकोर्टाने सुनावले. संप मागे घेतला जात असेल तर आम्ही तुमची बाजू लवकरात लवकर ऐकून घेऊ, असे न्यायालयाने नमूद केले. दरम्यान, या प्रकरणी पुढील सुनावणी ८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

## नियमानुसार काम जमत नसेल तर...

इतर शासकीय कार्यालयात वेळ फिक्स असते पण लॅबमध्ये तसं नसते. लॅब ही २४ तास चालू ठेवायची असते, ८ तास नाही. पण याचा अर्थ असा नाही की, कर्मचाऱ्यांनी २४ तास काम करावं. त्यांना ८ तासच काम आपण लावतो, फक्त ते शिफ्टमध्ये आहे.

प्रत्येकजण एकच शिफ्ट करणार, दिवसात दोन शिफ्ट नाही. आठवड्यात ४८ तासांच्या वर आपण त्यांना काम लावत नाही, नियमांच्या वर कुणीही त्यांना काम देत नाही. एक दिवस सार्वजनिक सुट्टी आपण देतो. अजून आपण २४ तास ७ दिवस काम सुरू केलेले नाही. आता फक्त दोन शिफ्टमध्ये सहा दिवस काम सुरू केले आहे. गरज पडली तर २४ ताससुद्धा आपण लॅब सुरू करावी लागेल आणि पुढच्या काही दिवसांत ते सुरू होईलच. खासगी लॅब आणि सरकारी लॅब २४ तास चालतात. ज्या कर्मचाऱ्यांनी माझ्या विरोधात तक्रार केली त्यांची पहिली मागणी अत्यंत चुकीची आहे, त्यामुळे ती पूर्ण होऊ शकत नाही. १० ते ६ या वेळेत त्यांना ऑफिस देऊ शकत नाही. आठवड्यात त्यांना एक सुट्टी आम्ही देतोय. त्यामुळे त्यांचा जर काही गैरसमज झाला असेल तर तो पुढच्या काळात दूर करू. आता तिथे व्यवस्थित काम सुरू आहे. त्यांना सांगितलं आहे की, या पद्धतीने काम होणे अपेक्षित आहे. ज्यांना शासन नियमांनुसार काम करायचं नाही ते राजीनामा देऊन निघून जाऊ शकतात, (दे आर फ्री टू रिजाईन अॅण्ड गो), असे त्यांनी म्हटले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Superintending Engineer, EHV (O&M) Circle, Chhatrapati Sambhajinagar, on behalf of MSETCL (the Employer) is hereby inviting online bids from reputed Contractors, registered on MAHATRANSCO SRM E-Tendering Website for the following works:

| S.N. | Particulars | RFx Name | Other Details |
|---|---|---|---|
| 1 | SRM Tender 3rd Call for Work of Overhauling / Servicing of 245kV SIEMENS make Circuit Breakers, at various S/stn. under EHV (O&M) Circle, Chhatrapati Sambhajinagar . | Overhauling 245kV Siemens make CBs **RFx.No. 7000040419 (3rd Call)** | **Tender Amount:** Rs. 54,99,120.08 **EMD Amount** Rs. 54,991.20 |

Tender available at : **https://srmetender.mahatransco.in/**,
Due date for Online submission of E-Tender is up to **Dt. 17.08.2026 up to 0:00 Hrs.** All future amendments to this tender will be published on MSETCL's website only.
**Contact Person:** Executive Engineer (O): **Phone No.** 8554995030,
**Email ID-** ee2100@mahatransco.in

**Sd/-
Superintending Engineer,
EHV (O&M) Circle, MSETCL,
Chhatrapati Sambhajinagar**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Superintending Engineer, EHV (O&M) Circle, Chhatrapati Sambhajinagar, on behalf of MSETCL (the Employer) is hereby inviting online bids from reputed Contractors, registered on MAHATRANSCO SRM E-Tendering Website for the following works:

| S.N. | Particulars | RFx Name | Other Details |
|---|---|---|---|
| 1 | SRM Tender 3rd Call for the Work of Overhauling / Servicing of 145kV SIEMENS make Circuit Breakers, at various S/stn. under EHV (O&M) Circle, Chhatrapati Sambhajinagar. | Overhauling 145kV Siemens make CBs **RFx.No. 7000040440 (3rd Call)** | **Tender Amount:** Rs. 1,26,03,865.31 **EMD Amount** Rs. 1,26,038.65 |

Tender available at : **https://srmetender.mahatransco.in/**,
Due date for Online submission of E-Tender is up to **Dt. 17.08.2026 up to 0:00 Hrs.** All future amendments to this tender will be published on MSETCL's website only.
**Contact Person:** Executive Engineer (O): **Phone No.** 8554995030,
**Email ID-** ee2100@mahatransco.in

**Sd/-
Superintending Engineer,
EHV (O&M) Circle, MSETCL,
Chhatrapati Sambhajinagar**